24/5/1990

Letter to Sardar from Rajhans (S. M Joshi socialist foundation)


# एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन

१८१३, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४१२१४
नोंदणी क्र. इ. १२९४ (पुणे)

अध्यक्ष : ना. ग. गोरे
कार्याध्यक्ष : मधु दंडवते
सेक्रेटरी : बा. न. राजहंस
कोषाध्यक्ष : सदानंद वर्दे


दिनांक : १७ मे. १९९०

प्रिय साथी अनिल सरदार

स. न.

आपणांस माहित आहेच की, एस.एम.जोशी यांचे कार्य सातत्याने पुढे चालावे म्हणून एस.एम.जोशी सोशलिस्ट फाउंडेशन ही संस्था स्थापन झाली आहे. एस.एम.जोशी आयुष्यभर ज्या तत्वासाठी व विचारासाठी झटले, त्या तत्वाची आणि विचारांची जोपासना करणे हे फाउंडेशनचे महत्वाचे कार्य आहे. त्या दृष्टीने विचाराच्या आधारावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची प्रशिक्षण शिबीरे घेण्याचा आमचा विचार आहे. महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागात किमान ६ शिबीरे या वर्षी घ्यावीत असा आमचा संकल्प आहे. प्रत्येक शिबीरांत ३० / ४० कार्यकर्त्यांचा सहभाग व्हावा अशी कल्पना आहे. तसेच ही शिबीरे ३ दिवसांची असतील. ही शिबीरे महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागात विभागून घेण्याची कल्पना आहे. सध्या आम्ही खालील ७ विभागात शिबीरां साठी जिल्हे नियुक्त केले आहेत.

१] सांगली, सातारा, कोल्हापूर, सिंधुदुर्ग [२] ठाणे, रायगड, रत्नागिरी
३] पुणे, नगर, सोलापूर [४] मराठवाडा [५] नाशिक, धुळे, जळगांव
६] अकोला, अमरावती, यवतमाळ [७] नागपूर, चंद्रपूर, भंडारा
शिबीराच्या संदर्भात काही सूचना असल्यांस त्याही कळवाव्यात.

आपणांकडून आम्हांस या संदर्भात खालील सहकार्य पाहिजे.
वरील विभागामध्ये तळागाळात काम करणाऱ्या सेवाभावी संस्था किंवा जनसंघटना यांची नांवे, पत्ते

२] या संघटनामध्ये काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांची नावे व पत्ते [ ४० वर्षांच्या आतील कार्यकर्ते असावेत. ]

३] आपल्या विभागात कोठे व केव्हा शिबीरे घेवू शकाल, यांची जबाबदारी कोण घेईल ते सुचवावे. [ प्रत्येक शिबीरासाठी ४ते ५ हजाराची रक्कम फाउंडेशनने मंजूर केलेली आहे. ]

३] आपल्याकडून ही सर्व माहिती ३१ मे ९० पर्यंत आल्यास जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर मध्ये शिबीरे आयोजित करणे सोपे जाईल.

कळावे.

आपला स्नेहांकित,
बा.न.रा.
[ बा. न. राजहंस ]

प्रति, श्री.